महाराष्ट्र शासन,महाराष्ट्र वनविभाग

**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य नागपूर पहिला माळा, बी विंग,वनभवन सिव्हील लाईन्स, नागपूर-४४०००१**

दूरध्वनी क्रमांक-(०७१२) २५५६९१६ ई मेल- apccfnodal@mahaforest.gov.in

**त्रिपक्षीय करारनाम्याद्वारे वृक्षारोपनासाठी रोपनिर्मीती व रोपवनकामाचा पूर्वानुभव असलेल्या अशासकीय संस्थांचे पॅनल तयार करणेचे दृष्टीने अर्ज मागविण्याबाबत.**

आदेयोगिक संस्था, अशासकीय संस्था व वन विभाग यांच्यामध्ये त्रिपक्षीय करारनामा करून अवनत वनक्षेत्राचे पुनर्वनीकरण करणेबाबत शासनाचे परीपत्रक क्रमांक एफएलडी-२०११/प्र.क्र.१६७/फ-१०, दि.२६/०६/२०१५ अन्वये सुधारीत मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर मार्गदर्शक सुचनांमध्ये ज्या अशासकीय संस्थेकडे रोपवाटीका व रोपवनाच्या कामाचा पूर्वानुभव असेल अशास अशासकीय संस्थेची निवड करण्यात यावी. असे नमूद आहे.

त्यानूषंगाने शासन पत्र क्र.एफएलडी-२०१७/प्र.क्र.४३७/फ-१०,दि.०७/०१/२०१९ अन्वये प्राप्त निर्देशानुसार त्रिपक्षीय करारनामाचा प्रस्ताव तयार करतेवेळी काही औदयोगिक संस्थांना त्यांचे कार्यक्षेत्रात रोपवाटीका व रोपवनाच्या कामाचा पूर्वानुभव असलेल्या अशासकीय संस्थेची निवड करतेवेळी अडचण आल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. सदर अडचणीवर तोडगा काढण्यासाठी संबंधित मुख्य वनसंरक्षक (प्रा.) यांचेमार्फत प्रत्येक जिल्हा स्तरावर त्या त्या जिल्हयातील अशासकीय संस्थांचे एक पॅनेल तयार करण्यासाठी त्रिपक्षीय करारनामाव्दारे वृक्षारोपन करण्यास इच्छुक असलेल्या अनुभवी अशासकीय संस्थांचे अर्ज मागविण्यात येत आहे. सदर अर्ज त्या त्या जिल्हयाचे मुख्य वनसंरक्षक (प्रा.) यांचेकडे सादर करण्यात यावे व सदर अर्जाची प्रत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य नागपूर यांचे संकेतस्थळावर पुढील नमुद ई मेलव्दारे apccfnodal@mahaforest.gov.in पाविण्यात यावे.

सदर अशासकीय संस्थेची त्यांच्या कार्यक्षेत्रात संपूर्ण जिल्हयात काम करण्यास इच्छुक असेल असेच सक्षम अशासकीय संस्था यांनी शासन परिपत्रकातील संपूर्ण निकषांना अधिन राहून अर्ज करण्यात यावे. तसेच महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्रमांक: एफएलडी-२०११/प्र.क्र.१६७/फ-१०, दि.२६/०६/२०१५ मधील निकष क्र.१५ ज्या शासकीय संस्थाकडे रोपवाटिका व रोपवनाचा कामाचा अनुभव असेल अशाच अशासकीय संस्थेची निवड खालील निकषांवर आधारावर राहील-

(१) अशासकीय संस्थेस प्रस्तावीत वनीकरक्षेत्रा इतक्याच क्षेत्रावरील वनीकरणाचा पूर्व अनुभव असावा व प्रस्तावीत क्षेत्र २० हे. पेक्षा जास्त असलेस किमान २० हे. क्षेत्रावर वनीकरणाचा अनुभव असणे आवश्यक राहील. तथापि, सदर बाबत समितीचा निर्णय अंतिम असेल.

(२) अशासकीय संस्था यांनी ज्या औदयोगिक संस्था किंवा कोणत्याही प्रतिष्ठानासाठी वानिकी क्षेत्रामध्ये केलेले कामाबाबत प्रमाणपत्र व कामाचे छायाचित्र आवश्यक राहतील.

अशासकीय वन व्यवस्थापन समित्यांना (JFMC) त्यांचे कार्यक्षेत्रात त्रिपक्षीय करारमध्ये अशासकीय संस्था काम करणेस मान्यता देण्यात यावी व त्यासाठी आवश्यक निधी औदयोगिक संस्थांनी या समित्यांकडे थेट वर्ग करण्याची संमती.

## अर्जाचा नमुना

१) अशासकीय संस्थेच नाव व नोंदणी क्र.:-
२) नुतणीकरण केल्याचा दि. व कालावधीः-
३) केलेल्या कामाचा अनुभव खालील नमुद मुदयांच्या अंर्तभावासहः-
अ) आज अखेर लागवड केलेल्या रोपांची वर्षवार माहितीः-
ब) रोपनिर्मीतीच्या कामाबाबत अनुभवः-

४) आजमितीस लागवड केलेल्या रोपांची जिवंत टक्केवारीः-

५) पुर्वपावसाळी कामापासून ते रोपवन लागवडीपर्यंतचे छायाचित्रेः-

६) मागील तीन वर्षाचे संस्थंचे लेखापरिक्षण अहवालः-

७) संबंधीत जिल्हयाचे उपवनसंरक्षक व मुख्य वनसंरक्षक (प्रा.) यांचे अभिप्रायः-

## अर्ज सादर करणेबाबत वेळापत्रक.

१) अर्ज सादर करण्याची अंतीम तारीख दि.३१/०१/२०१९ पर्यंत.

२) मुख्य वनसंरक्षक(प्रा.) यांचेकडून अर्जाची छाननी दि.०७/०२/२०१९.

3) जिल्हा स्थरावर अंतीमतः निवड केलेल्या संस्थांची यादी जाहीरकरणे दि.१५/०२/२०१९.

४) विहीत मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंन्द्रस्थ अधिकारी**
**महाराष्ट्र राज्य,नागपूर**